Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# नेतृत्वाची भाषा

26 Aug 2011, 0341 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

नेतृत्वाची एक स्वतंत्र भाषा असते. एखादी व्यक्ती एखाद्या पक्षाचे, संस्थेचे, आस्थापनाचे नेतृत्व करीत असते, तेव्हा त्या व्यक्तीला आपल्या पक्षसदस्यांशी, सहकाऱ्यांशी, कामगारांशी संवाद साधायचा असतो. या संवादातून त्याला पक्षाची, संस्थेची, आस्थापनेची उद्दिष्टे साध्य करायची असतात. म्हणजेच तो समूहाचे नेतृत्व करीत असतो, त्याची जबाबदारी सामुदायिक असते. त्याला वेगवेगळ्या विचारांच्या, स्वभावाच्या, वृत्तीच्या लोकांना बरोबर घेऊन आपले, पर्यायाने संस्थेचे ध्येय गाठायचे असते. अशावेळी तो नेत्याच्या भाषेत बोलला नाही तर त्याची प्रशासनावर पकड राहू शकत नाही, त्याच्या सहकाऱ्यांमध्ये त्याच्याविषयी विश्वास उरत नाही. परिणामत: त्याला अपेक्षित ध्येय गाठता येत नाही. हा अनुभव मी घेतला तो आय. ई. एस.चे आर्किटेक्चर आणि मॅनेजमेंट कॉलेज सुरू केले तेव्हा.

या कॉलेजसाठी त्या त्या विषयातले प्राध्यापक, जाणकार व्याख्याते, चांगला ग्रंथपाल, शिक्षकेतर कर्मचारी अशी टीम मी बांधत होतो. मी एक व्यावसायिक असल्याने या कॉलेजसाठी पूर्ण वेळ देऊ शकत नव्हतो. त्यामुळे या टीमचे नेतृत्व करण्यासाठी एखाद्या जाणकार तज्ज्ञाची गरज होती. अशी व्यवस्थापनशास्त्रातली तज्ज्ञ, जाणकार व्यक्ती माझ्या जवळच्या परिचितांत होती. मी त्या व्यक्तीला या कॉलेजच्या नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारायची विनंती केली.

आय. ई. ए.चे मॅनेजमेंट आणि आर्किटेक्ट कॉलेज असे दोन प्रकल्प सुरू करण्याच्या कल्पनेने मी झपाटलो होतो. मात्र या संस्थेच्या कार्यकारिणीत ४० ते ८० वयोगटातील वेगवेगळ्या क्षेत्रांतील मान्यवर व्यक्ती होत्या. त्यांनी अनेक वर्षे संस्थेच्या शाळा उत्तम प्रकारे चालवल्या होत्या; पण त्यांना पोस्ट ग्रॅज्युएशन कोर्सचा अनुभव नव्हता. त्यामुळे या मंडळींना बरोबर घेऊन पुढे जाण्याची कसरत मला करावी लागत होती. त्यात आमच्या व्यवस्थापन तज्ज्ञाने मॅनेजमेंट कॉलेजच्या कामात नेतृत्वाबरोबर येणाऱ्या जबाबदाऱ्या मात्र स्वीकारल्या नाहीत. नेत्याला नेहमीच पुढाकार घ्यावा लागतो, त्याचबरोबर लवचिकता दाखवून सर्वांचे समाधान करावे लागते. स्वत:चा अहंकार बाजूला ठेवावा लागतो. सहकाऱ्यांचे काही चुकत असल्यास ते सतत बोलून न दाखवता आपले काम साधावे लागते. पण ही नेतृत्वाची भाषा आमच्या व्यवस्थापन तज्ज्ञांना वापरता आली नाही. परिणामी त्यांच्यात-माझ्यात आणि त्यांच्यात-आमच्या टीममध्ये विचारांची दरी निर्माण झाली, याचा फायदा (?) ज्यांनी घ्यायचा त्यांनी घेतलाच.

असा अनुभव घेतल्यावर मला समर्थांनी सांगितलेले नेत्याचे गुण आठवले. ते म्हणतात, वेड्यास वेडा म्हणो नये। वर्म कदापि बोलो नये। तरीच घडे दिग्विजये। निस्पृहासी।। नेतृत्वाची भाषा सर्वांचे समाधान करणारी असते. इतरांना न दुखावता कौशल्याने त्यांच्याकडून काम करवून घेणे हीच नेतृत्वाची कसोटी असते. तुम्ही एखाद्या टीमचे नेतृत्व करीत असता तेव्हा त्या टीमच्या यशाप्रमाणेच अपयशातही तुमचा वाटा असतो हे विसरता कामा नये. यासाठी नेत्याची भाषा आत्मसात करणे आवश्यक असते.

- डॉ. सुधीर निरगुडकर

Recommend Sign Up to see what your friends recommend.

या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap

Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service

This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768